# सह्याद्रि सहकारी साखर कारखाना लिमिटेड, यशवंतनगर,
## तालुका-कराड, जिल्हा-सातारा.

फोन नंबर कारखाना ८९५६०१५५०१ ते ५ E-mail:Sahyadrisugar@gmail.com

## - स्क्रॅप मालाचा जाहिर लिलाव -

कारखाना मालकीच्या स्क्रॅप वस्तूंचा जाहीर लिलाव शनिवार दिनांक २८/१२/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता कारखाना गेस्ट हाऊस नजिकच्या हॉलमध्ये मा.कार्यकारी समिती सभेसमोर होणार आहे. लिलावात भाग घेणेपूर्वी प्रवेश फी रूपये २०००/- भरणे आवश्यक आहे ती बिन परतीची राहील आणि बोलीपूर्वी अॅटमनुसार भरावयाची सहभाग रक्कम भरलेल्या व्यक्तीलाच लिलावात बोली करता येईल व ती जी.एस.टी विरहीत असेल. लिलावाच्या अटी व शर्ती तसेच जाहीर केलेल्या स्क्रॅप हेवी लोखंड, एस्.एस्.ट्यूब, ब्रास ट्युब आदि स्क्रॅप वस्तूंची यादी, त्याची संख्या, वजन आदी माहिती कारखान्याचे सुट्टीचे दिवस सोडून कामकाजाचे वेळेत कारखाना ऑफिसमध्ये आणि कारखान्याच्या www.sahyadrisakhar.com या बेवसाईटवर पहावयास मिळेल. अंतिम लिलाव बोलणाऱ्या व्यक्तीस मंजूर वस्तूंच्या एकूण रकमेच्या २५ % इतकी रक्कम जागेवरच भरावी लागेल.

| अ.नं. | स्क्रॅप मालाची यादी | अंदाजे संख्या/वजन |
|---|---|---|
| १ | सर्व प्रकारचे स्क्रॅप हेवी लोखंड | ३०० मे.टन |
| २ | स्क्रॅप बेअरिंग | १ मे.टन |
| ३ | स्क्रॅप एस्.एस्.ट्युब व इतर स्टील मटेरियल | २.५ मे.टन |
| ४ | स्क्रॅप ब्रास ट्युब | २५० किलो |
| ५ | स्क्रॅप निकेल स्क्रीन | ३५० किलो |
| ६ | स्क्रॅप कॉपर मटेरियल | १ मे.टन |
| ७ | स्क्रॅप ऑलिव्हर स्क्रीन | २०० किलो |
| ८ | स्क्रॅप ब्रास जाळी | २०० किलो |
| ९ | स्क्रॅप एस्.एस्.वायरनेटींग (जाळी) | २०० किलो |
| १० | स्क्रॅप अॅल्युमिनियम मटेरियल | ४०० किलो |

पान दोन..

# लिलावाच्या अटी व शर्ती

१. लिलावात भाग घेणेपूर्वी प्रवेश फी म्हणून रूपये २०००/- रोख रक्कम जे लिलावात बोली करून माल खरेदी करू इच्छितात त्यांच्याच नांवावर भरावी लागेल. ती बिनपरतीची राहील. तसेच सहभाग रक्कम- स्क्रॅप माल लिलाव यादीतील अ.नं.१ करिता रूपये १,००,०००/- अ.नं.२ ते १० करिता रूपये ५०, ०००/- रकमेचा डी.डी.ने लिलावात बोली करून माल खरेदी करू इच्छितात त्याच्याच नावांवर भरावा लागेल. सदर रक्कम भरणाऱ्या व्यक्तीलाच लिलावाच्या ठिकाणी प्रवेश दिला जाईल. आणि त्यांनाच लिलावात बोली करता येईल.

२. जाहीर लिलावात भाग घेवू इच्छिणाऱ्या व्यक्तीने अगर संस्थेने वर नमूद केलेली सहभाग रक्कम भरल्यानंतर लिलावाचे वेळेपूर्वी आपले संपूर्ण नांव व पत्ता रजिस्टरमध्ये नोंदवून घेतलेला असला पाहिजे. अशा व्यक्तीला किंवा संस्थेला लिलावात बोलणेचा अधिकार राहील.

३. प्रत्येक मालाचा लिलाव तीनवार पुकारणेत येईल. परंतु जर एखाद्या वस्तुस योग्य किंमत आली नाही तर त्या वस्तुपुरता लिलाव रद्द करणेचा अधिकार कारखान्याने राखून ठेवलेला आहे.

४. लिलावात बोली केल्यानंतर व ती मंजूर झालेनंतर ज्याचे नांवे लिलाव मंजूर झाला असेल त्या व्यक्तीने सदर वस्तूचे अंदाजे किंमतीच्या २५% रक्कम त्याचवेळी लगेच कारखान्याकडे डी.डी.व्दारे भरणा केली पाहिजे. त्यानंतरच लिलावातील पुढील वस्तूंचा लिलाव सुरू केला जाईल.

५. लिलावात घेतलेला माल आहे त्या जागेवरून व आहे त्या स्थितीत पूर्णपणे घ्यावा लागेल. कोणतीही वस्तू बदलून दिली जाणार नाही किंवा याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

६. लिलावात घेतलेला माल कार्यालयाचे वेळेत म्हणजे सकाळी ०८.३० ते सायंकाळी ५.३० या कालावधीत उचलता येईल. माल उचलण्यापूर्वी भांडार विभागास त्याप्रमाणे आगाऊ सूचना दिलेली असली पाहिजे.

७. लिलावात घेतलेला स्क्रॅप हेवी लोखंड संपूर्ण माल लिलावाचे तारखेपासून १ महिन्याच्या आत व इतर स्क्रॅप माल १५ दिवसाच्या आत उचलण्याचे बंधनं लिलाव घेणारे व्यक्तीवर राहील. अन्यथा वरील मुदतीत माल न उचलल्यास त्या दिवसाच्या मुदतीनंतर लिलावात घेतलेल्या वस्तूंची विल्हेवाट लावण्याचे अधिकार कारखान्याने राखून ठेवलेले आहेत व सदर लिलावाचे पोटी भरणा केलेली २५ % रक्कम जप्त करणेत येईल. याबाबत नंतर कोणतीही तक्रार अगर कायदेशीर मालकी हक्क ग्राह्य धरला जाणार नाही.

८. लिलावात घेतलेला माल उचलणेपूर्वी सदर मालाची बोली केलेली संपूर्ण रक्कम भरलेली असली पाहिजे. व माल गेटबाहेर नेणेपूर्वी योग्य तो परवाना घेतलेला असला पाहिजे.

९. लिलावात घेतलेला माल कारखान्याचे परिसरातून घेवून गेलेनंतर त्याची पुढील विल्हेवाट करताना जर एखाद्याने कायदेशीर गुंतागुंत निर्माण केली तर त्याची संपूर्ण जबाबदारी त्या व्यक्तीची स्वतःची राहील.

१०. लिलावात स्विकारलेला माल घेवून जातेवेळी जर एखादे मुद्यावर मतभेद झाले तर त्याबाबतचा अंतिम निर्णय मा.कार्यकारी समिती घेईल. तो माल घेणाऱ्या व्यक्तीवर कायदेशीररित्या बंधनकारक राहील.

११. लिलावात घेतलेल्या मालाची मोजदाद करून घेतेवेळी जर एखादे ठिकाणी मालाची संख्या जाहीर केलेले संख्येपेक्षा कमी किंवा जास्त निघाली तर त्याची आकारणी मंजूर दराने केली जाईल.

१२. लिलावात मालाच्या होणाऱ्या किंमतीवर त्या-त्या मालाच्या डिलीव्हरीच्यावेळी लागू असणाऱ्या दराने कर आकारला जाईल.

१३. लिलावात स्विकारलेल्या मालाशिवाय दुसरा माल लॉट मध्ये सापडल्यास तो बाहेर काढून घेण्याचा अधिकार कारखान्यास राहील.

१४. लिलाव मंजूर अगर नामंजूर करणेचा अधिकार कारखान्याने राखून ठेवला आहे.

(ए.जे.पाटील)
कार्यकारी संचालक,
सह्याद्रि सहकारी साखर कारखाना लिमिटेड